


कोल्हापूर : ताराराणी विद्यापीठातर्फे सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील यांच्या चवेचाळीसाव्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. अशोक चौसाळकर. शेजारी रा. कृ. कणबरकर, डॉ. क्रांतिकुमार पाटील.

# स्त्रियांना स्वयंनिर्णयाचा अधिकार द्या : चौसाळकर

## 'महात्मा गांधी आणि स्त्री प्रश्न' विषयावर व्याख्यान

कोल्हापूर, ता. १९ : स्त्रियांच्या बलस्थानांचा शोध घेऊन त्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार द्या, असे आवाहन डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले. ताराराणी विद्यापीठातर्फे सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील यांच्या ४४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते 'महात्मा गांधी आणि स्त्री प्रश्न' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर होते. व्ही. टी. पाटील स्मृतिभवन येथे कार्यक्रम झाला.

डॉ. चौसाळकर म्हणाले, "स्त्रियांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय प्रगतीसाठी महात्मा गांधींच्या विचारांची आवश्यकता आहे. त्या अबला नाहीत. त्यांचे सामाजिक क्षेत्रातील काम अवर्णनीय आहे." ते म्हणाले, "बालविवाह, पुनर्विवाहाला बंदी, कुटुंबसंस्थेची बंधने स्त्रियांवर होती. गांधीजींनी या बंधनांना विरोध केला आणि स्त्री व पुरुष यात समानता असावी, असा विचार मांडला." या वेळी होतकरू विद्यार्थिनींना गणवेशाचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्रा. चंद्रकांत पाटगावकर, प्रा. डॉ. एस.एन. पवार, विजया निकम-पाटील उपस्थित होते. अंजली साठे यांनी स्वागत केले. प्रा.डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. जयसिंग सावंत यांनी आभार मानले.

Scanned by CamScanner